# कोरोना व्हायरस आणि जुने आजार

## प्रतिबंधाचा एक अतिरिक्त डोस

उच्च रक्तदाब, मधुमेह आणि इतर जुने आजार असलेल्या प्रौढ व्यक्तींना विशेषत: कोरोना व्हायरसचा संसर्ग होऊ शकतो. त्याचा प्रसार थांबवण्यात आणि रुग्णांच्या आरोग्याचे संरक्षण करण्यात आपली सर्वांची महत्वाची भूमिका आहे.

## आरोग्य सेवा प्रदात्यांसाठी टिपा



- आपल्या संस्थेमध्ये , सर्व रुग्णांसाठी उपकरणाच्या निर्जंतुकीकरणासह मानकानुसार खबरदारी बाळगा.
- सर्दी आणि फ्लूची लक्षणे असलेल्या रूग्णांच्या उपचाराचा क्रम ठरवणे आणि लवकर ओळखणे महत्त्वाचे आहे. शक्य असल्यास त्यांना वेगळ्या क्षेत्रात ठेवा.
- रुग्ण तपासण्यासाठी आणि काळजी घेण्यासाठी एक योजना तयार करा. त्याकरिता मोबाइल संदेश किंवा फोन करून आपल्या उच्च रक्तदाब, मधुमेह आणि इतर असंसर्गजन्य आजार (NCD) असलेल्या रूग्णांपर्यंत पोहचा.
- कोरोना व्हायरसच्या प्रादुर्भावामुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रांमध्ये, अनावश्यक संसर्ग टाळण्यासाठी जोपर्यंत रुग्णांस लक्षणे किंवा इतर तातडीची आवश्यकता नाही, तोपर्यंत त्यांना आरोग्य सेवा सुविधा टाळण्यासाठी प्रोत्साहित करा.
- सर्दी आणि फ्लूची लक्षणे असलेल्या रूग्णांसाठी, व्हायरसचा संसर्ग टाळण्याकरिता श्वसनविषयक खबरदारी* घ्या.
- आपल्या संस्थेमध्ये येणाऱ्या स्थिर रूग्णांसाठी, आपण दीर्घकालीन प्रिस्क्रिप्शन लिहून द्या (90 दिवस)





- समाजातील जुन्या NCD रुग्णांसाठी मोबाइल फ़ार्मेसी किन्वा दूरस्थ औषध वितरण प्रणाली स्थापन करा ,जी करोना ग्रसित रूग्णांना सेवा दिल्या जाणाऱ्या संस्था पासून दूर असेल.

*https://www.who.int/publications-detail/infection-prevention-and-control-during-health-care-when-novel-coronavirus-(ncov)-infection-is-suspected-20200125

रिझोल्व्ह टू सेव्ह लाइव्ह्स हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग आणि साथीच्या रोगांपासून लाखो लोकांचा मृत्यू टाळण्यासाठी कार्य करत आहे. अधिक माहितीसाठी, www.resolvetosavelives.org आणि www.preventepidemics.org ला भेट द्या.

RESOLVE TO SAVE LIVES
AN INITIATIVE OF VITAL STRATEGIES